पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघ बुथनिहाय आकडेवारी वाचा पान ४/५




# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १३, मंगळवार २६ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# नगर जिल्हा : विधानसभेचा निकाल आश्चर्यकारक नव्हे तर अविश्वसनीय!

महाराष्ट्रात सन १९५२ नंतर सन २००४ मध्ये विधानसभेची १६ वी सार्वत्रिक निवडणूक पार पडली. राज्यात आणि अहमदनगर जिल्ह्यात आतापर्यंत असे आश्चर्यकारक आणि अविश्वसनीय निकाल कधीच लागले नव्हते. तो चमत्कार यावेळी झाला आहे, हे या निवडणूकीचे आगळे-वेगळे वैशिष्टये मानावे लागेल.

एखादी युती अथवा आघाडीच्या बाजूने निकाल येणे याचे अप्रुप नसायचे. एखादा, दुसरा अपवाद वगळता जनतेने काँग्रेसचे सर्व आमदार निवडून दिल्याचा इतिहास आहे, पण त्याचेळी बॅलेट पेपरवर निवडणूका व्हायच्या. त्याबाबत कोणाच्या मनात शंका-कुशंका नसायच्या. तो जनादेश स्वीकारार्ह ठरायचा. पण अलिकडे इव्हीएम मशीनवर मतदान होते, त्याबाबत जनतेच्या मनात शंका आहेत. यावेळी महायुतीचे उमेदवार मोठया प्रमाणावर निवडून आले आहेत. त्यांच्या विजयाबाबत आता शंका-कुशंका प्रदर्शित करणे अप्रस्तुत असले तरी सुध्दा संगमनेरमधून मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेतील काँग्रेसचे उमेदवार बाळासाहेब थोरात यांचा दारूण पराभव आणि शिर्डीतून भाजपचे उमेदवार राधाकृष्ण विखे यांना आतापर्यंत आठ निवडणूकीत जेवढे मते मिळाली नाहीत त्यापेक्षा जास्त मिळालेले मताधिक्य पचनी पडत नाही.

सहा महिन्यांपूर्वी नगर जिल्ह्यातील दोन्ही जागा महाविकास आघाडीला मताधिक्याने मिळाल्या होत्या. राधाकृष्ण विखे यांचे पुत्र डॉ. सुजय विखे दक्षिणेतून पराभूत झाले होते. मग सहा महिन्यात असा कोणता राजकीय चमत्कार घडला की विद्यमान खासदार नीलेश लंके यांची पत्नी पारनेर विधानसभा मतदार संघात पराभूत व्हावी आणि शिर्डीत विखे यांना प्रचंड लिड मिळावे याचे राजकीय अकलन होत नाही.




## बहिणीला श्रेय देण्याचा प्रयत्न

आता लाडक्या बहिणीला विजयाचे श्रेय देण्याचा केविलवाणा प्रयत्न होत आहे. मात्र त्यांची प्रत्येक मतदारसंघातील संख्या मर्यादीत असून त्या निकाल फिरवू शकत नाहीत. नगर जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर केल्याचा हा परिणाम आहे का तर तोही तसा दिसत नाही. महायुतीने निवडणूक प्रचारात हा मुद्दा आणला नव्हता आणि त्याचे राजकीय श्रेय उघडरित्या घेतले नव्हते. नामांतरावर संपूर्ण निवडणूकीत चर्चाही झाली नव्हती. एवढेच नव्हे तर नामकरणाचा शासन दरबारी प्रस्ताव आणणारे भाजपचे उमेदवार प्रा. राम शिंदे पराभूत झाले आहेत. मग याचा अन्वयार्थ काय?

## पोष्टल मतांचा ट्रेंड

आमचा आतापर्यंतचा अनुभव असा आहे की पोष्टल मतांच्या ट्रेंड प्रमाणे सर्वसाधारण निकाल लागतात. कदाचित एखादा दुसरा अपवाद असून शकतो. पण यावेळी पोष्टल मतदानात महाविकास आघाडीचे उमेदवार पुढे आणि मशिनच्या मतदानात त्यांचा पराभव व्हावा ही ठळक बाब सद्सदविवेक बुध्दीला हजम होत नाही.

## गल्ली-बोळांतही शंका !

आतापर्यंत नेते आणि पुढारीच इव्हीएम मशीनवर शंका घेत होते. परंतू आता गल्ली बोळांतील लोक सुध्दा शंका प्रदर्शित करतात ही बाब दुर्लक्षून चालता येणार नाही. सत्तारूढ पक्षाकडून खंडन केले जाऊ शकते. त्याचे मुळ सुध्दा याच नगर जिल्हयात आहे. डॉ. सुजय विखे यांनी या मशिनबाबत शंका घेऊन कोर्टाच्या माध्यमातून पडताळणी करून घेतली. कोर्टाने मशिन योग्यच असल्याचे शिक्कामोर्तब केले आहे. तेंव्हा आता त्यावर सर्वसामान्याने चर्चाच करू नये अशी विधानसभा निवडणूक पूर्व जाणीवपूर्वक सोय करून ठेवलीच आहे ! परंतू अशा कोर्टबाजीने सर्वसामान्य जनतेच्या शंकेवर पडदा पडणे कठीण दिसते. लंघे, दाते अथवा इतर उमेदवार विजयी झाले यापेक्षा बाळासाहेब थोरात पराभूत व्हावेत ही या नगर जिल्हयाची मोठी राजकीय जखम आहे.

## माजी आमदारांच्या उमेदवाऱ्या

नगर जिल्हयातील निकाल बदलण्यास माजी आमदारांची अपक्ष उमेदवारी काही प्रमाणात कारणीभूत ठरते. श्रीगोंद्यात माजी आमदार राहुल जगताप यांच्या उमेदवारीमुळे भाजपाचे विक्रम पाचपुते यांची लॉटरी लागली. शेवगांव-पाथर्डीत माजी आमदार चंद्रशेखर घुले यांच्या उमेदवारीचा भाजपाच्या विजायासाठी लाभ होऊन मोनिका राजळे आमदार झाल्या. अकोल्यात माजी आमदार वैभव पिचड याच्या उमेदवारीमुळे लहामटे यांचा विजय सोपा झाला. श्रीरामपुरात कांबळे यांची उमेदवारी हेमंत ओगले यांच्या पथ्यावर पडली. पारनेरमध्ये माजी आमदार विजय औटींच्या उमेदवारीने ही राजकीय किमया साध्य केली नाही. पण ती कसर मा. जि प सदस्य संदेश कार्ले यांनी भरून काढत युतीचे काशिनाथ दाते यांचा मार्ग सुकर केला.

## औटी यांचा खटाटोप कशासाठी?

मतदानाचे आकडे लक्षात घेता माजी आमदार विजय औटी यांच्यापेक्षा संदेश कार्ले यांना जास्त मते आहेत. मग औटी यांनी हा खटाटोप का आणि कशासाठी केला ? विशेष प्रचार न करता आपण राजकीय चमत्कार घडवू ही त्यांची श्रध्दा होती की अंधश्रध्दा याचे कोडे उलगडणे अवघड आहे. हे इंगित यथावकाश पुढे येऊ शकते. नेवासा मतदारसंघात मा. आमदार बाळासाहेब मुरकुटे यांची उमेदवारी युतीचे विठ्ठलराव लंघे यांना धोकादायक ठरू शकते असा जो तर्क होता तो तसा फोल ठरून त्यांचा राजकीय फटका शंकरराव गडाख यांनाच बसला.

## आशुतोष काळे यांचा निखळ विजय

निखळ विजय मानायचा ठरला तर तो कोपरगांवचे आशुतोष काळे यांचा आहे. ते प्रचंड मताधिक्क्याने विधानसभेत दुसऱ्यांदा गेले आहेत. त्याचे कारण विवेक कोल्हे यांनी जो थांबण्याचा निर्णय घेतला, त्यात दडलेले दिसते. पण नगर शहर हाय होल्टेज मतदारसंघात संग्राम जगताप यांनी एकहाती विजय मिळविला तो कसा हा संशोधनाचा मुद्दा ठरू शकतो. तर कर्जत जामखेडमध्ये रोहित पवार आणि राम शिंदे यांची अटीतटीची झुंज झाली. हा निकाल लवकरच न्यायप्रविष्ट होण्याची शक्यता आहे. तर राहुरीत कर्डिले यांनी पुन्हा विजय मिळविला. पण तनपुरे यांचा पराभव पचनी पडत नाही.

# दोन्ही पवारांच्या कटाचा मी बळी ठरलो!

## भाजप नेते आ .राम शिंदे यांची खदखद

जामखेड : प्रतिनिधी

**कर्जत-जामखेडमध्ये माझा पराभव नियोजित कट होता. यात माझा बळी गेला. अजित पवार यांनी रोहित पवार यांना तुझ्या मतदारसंघात सभेला आलो असतो तर काय झाले असते, हा व्हिडिओ व्हायरल होत आहे. यावर बोलताना भाजप नेते आमदार राम शिंदे यांनी हे वक्तव्य केले आहे.**



आ.राम शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, आमदार रोहित पवार जे स्वत:ला भावी मंत्री, भावी मुख्यमंत्री समजतात, त्यांनी या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावला नाही. एकूणच राजकीय सारीपाठामध्ये जे घडले त्यांचा मी बळी ठरलो आहे.

**महायुतीचा धर्म मोठ्या नेत्यांनी पाळायला हवा होता**

आ.राम शिंदे म्हणाले की, या विषयावर मला माध्यमांसमोर बोलण्याची इच्छा नव्हती. पण अजित पवार या विषयावर बोलले त्यामुळे मला या विषयावर बोलल्याशिवाय पर्याय नाही. यावर पक्षश्रेष्ठीसोबत मी आधीच बोललो आहे. त्यांच्या कौटुंबिय कलहात जे अघोषित सामजस्य करार झाले ते कर्जत-जामखेडमध्ये जाणवत आहे. महायुतीचा धर्म मोठ्या नेत्यांनी पाळायला हवा होता. माझ्यासारखा छोट्या शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या व्यक्तीने बलाढ्य शक्तीच्याविरोधात मी लढा दिला. राज्यात कमी फरकाने पराभूत झालेल्या उमेदवारांमध्ये माझे नाव आहे. मला जवळपास १ लाख २६ हजार मते मिळाली. माझ्याविरोधात अघोषित कारवाईच्या कटाचा मी बळी ठरलो आहे.

**..हे चांगले नाही**

राम शिंदे म्हणाले की, महायुतीमधील वरीष्ठनेत्यांकडे तक्रार करण्यापेक्षा जर त्यांच्यावरच असा प्रश्न उपस्थित होत असेल तर हे चांगले नाही.आमच्या वरीष्ठाने यांचा गांभीर्याने लक्ष घालायला हवे. फेरमतदान मोजणीसाठी अर्ज केला होता पण तो फेटाळण्यात आला. जिल्हाधिकार्यांकडे मी आज जाणार आहे.

**अजित पवार-रोहित पवारांची प्रीतीसंगमावर भेट**

विधानसभा निवडणुकीच्या विजयानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कराड मधील प्रीतीसंगमावर यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस्थळावर जाऊन दर्शन घेतले. यावेळी अजित पवार आणि आमदार रोहित पवार समोरासमोर आले. रोहित पवार यांनी चरणस्पर्श करत अजित पवार यांचे आशीर्वाद घेतले. या दरम्यान अजित पवार यांनी रोहित पवार यांना उद्देशून म्हणाले की, बेट्या थोडक्यात वाचलास, माझी सभा झाली असती तर... असे म्हणत अजित पवार यांनी रोहित पवार यांना टोला लगावला.

# भारताने कांगारूला लोळवले!

## पर्थ कसोटीत ऑस्ट्रेलियावर नामुष्की । टीम इंडियाचा पहिल्या सामान्यात दणदणीत विजय

पर्थ:वृत्तसंस्था

**नियमित कर्णधार रोहित शर्माच्या अनुपस्थितीत भारतीय क्रिकेट संघाने आश्चर्यकारक कामगिरी केली. जसप्रीत बुमराहच्या मारेकऱ्या गोलंदाजीच्या जोरावर भारतीय क्रिकेट संघाने पर्थ कसोटीत यजमान ऑस्ट्रेलियाचा २९५ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. भारतीय संघाने दिलेल्या ५३४ धावांच्या डोंगरासारख्या लक्ष्यासमोर यजमान संघ गारद झाला. भारतीय संघासाठी पहिल्या डावात पाच बळी घेणारा कर्णधार जसप्रीत बुमराह दुसऱ्या डावातही हिरो ठरला. अशाप्रकारे ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव २३८ धावांत आटोपून भारताने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.**

भारताचा ऑस्ट्रेलियन भूमीवरील सर्वात मोठा विजय

या मैदानावर ऑस्ट्रेलियाची कसोटी हरण्याची ही पहिलीच वेळ आहे. ऑस्ट्रेलियातील धावांच्या बाबतीत भारताचा हा सर्वात मोठा विजय आहे. भारताला यापूर्वी असा विजय मिळाला नव्हता. यापूर्वी १९७७ मध्ये मेलबर्नमध्ये भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाचा २२२ धावांनी पराभव केला होता, तर एकूणच हा दुसरा सर्वात मोठा विजय आहे. २००८ मध्ये मोहालीत भारताचा ३२० धावांनी लाजिरवाणा पराभव झाला होता. अशाप्रकारे भारतीय संघ आता या मालिकेत ७व्या स्थानावर आहे.

**मिया मॅजिकची चमक**

सामन्याच्या चौथ्या दिवशी, मोहम्मद सिराजने सकाळच्या सत्रात शानदार गोलंदाजी केली आणि सलामीवीर उस्मान ख्वाजा आणि फॉर्मात नसलेल्या स्टीव्ह स्मिथला पॅव्हेलियनमध्ये



पाठवले, पहिल्या क्रिकेट कसोटीच्या चौथ्या दिवशी ऑस्ट्रेलियाने भारताच्या ५३४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग केला. उपाहारापर्यंत १०४ धावांत पाच गडी गमावले. ऑस्ट्रेलियाने दिवसाची सुरुवात ३ विकेट्सवर १२ धावांवर केली.

**बुमराहने वेदनादायक ट्रॅव्हिस हेडला बाद केले**

ट्रॅव्हिस हेड (८९ धावा, १०१ चेंडू आणि ८ चौकार) आणि स्मिथने १७ धावा करत भारताला काही काळ सतत अडचणीत आणले. पाचव्या विकेटसाठी काही धावा जोडून भारताला नक्कीच अडचणीत आणले, पण उपाहारानंतर भारताने हेडला विजय मिळवून दिला. पटकन चालायला सुरुवात केली. मात्र, खराब होत असलेल्या खेळपट्टीवर हेड शानदार फलंदाजी

उर्वरीत पान ३ वर

# 'महायुती' १६० पुढे गेल्याचे भाजपवाल्यांनाही आश्चर्य असावे

## आमदार रोहित पवारांचा मतयंत्रावर संशय

कराड :प्रतिनिधी

**मतयंत्राबाबतची (ईव्हीएम) भूमिका नक्कीच संशयास्पद असून, 'महायुती'चे संख्याबळ १६० च्या पुढे कसे गेले? याचे भाजपवाल्यांनाही आश्चर्य वाटत असेल. महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला जातात आणि गुजरातची मतयंत्रं महाराष्ट्रात येतात. त्यामुळे त्यात काहीतरी घोळ असून, राज्यात बऱ्याच उमेदवारांचे मताधिक्य जवळपास सारखेच कसे? अशा आमच्या अनेक प्रश्नांची निवडणूक आयोगाने समर्पक उत्तरे द्यावीत अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली.**

माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या ४० व्या पुण्यतिथीनिमित्त कराडच्या प्रीतिसंगमावरील



त्यांच्या समाधीस्थळी रोहित पवारांनी अभिवादन केले. त्यानंतर माध्यमांशी ते बोलत होते.

आ.रोहित पवार म्हणाले, मतयंत्रासंदर्भातील न्यायालयीन लढाईबाबत महाविकास आघाडीचे वरिष्ठ नेते योग्य तो निर्णय घेतील. हा विषय न्यायालयात गेल्यावर योग्य वेळेत निकाल मिळणे गरजेचे आहे. नाहीतर राष्ट्रवादीकाँग्रेसकोणाची? याबाबतच्या निकालाला तीन वर्षे कधी निघून गेली, हे कळलेही नाही. उशिरा दिलेले निकालही अन्यायच असतो, असे मत रोहित पवार यांनी नोंदवले. मध्यप्रदेशमध्ये कुणाल पाटील यांना त्यांच्या राहत्या गावात एकही मत मिळाले नसल्याचे आश्चर्यही त्यांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या न्यायालयीन सुनावणीसंदर्भात ते म्हणाले, उच्च व सर्वोच्च न्यायालयाकडून आता कोणत्याही अपेक्षा राहिलेल्या नाहीत. लोकांवर विश्वास होता. परंतु, महाराष्ट्रात लागलेला निकाल हा लोकांसाठीही अनपेक्षित आहे. नेत्यांनी जरी तो स्वीकारला तरी पदाधिकारी, कार्यकर्त्यांना तो उर्वरीत पान ३ वर

# महायुतीचं अखेर ठरलं! देवेंद्र फडणवीसच होणार मुख्यमंत्री

## एकनाथ शिंदे, अजित पवारांना उपमुख्यमंत्रीपद

मुंबई : प्रतिनिधी

**राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा धुव्वा उडवत महायुतीने जोरदार मुसंडी मारली आहे. आता निवडणुकीच्या निकालानंतर सत्तास्थापनेसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. अशात महायुतीमधून भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे.**

भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला मंजूरी दिली असून, शिवसेना आणि राष्ट्रवादीनेही या निर्णयला होकार दिला आहे. भाजपामधल्या दोन उच्चपदस्थ नेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार इंडियन एक्सप्रेसने याबाबत वृत्त दिले आहे. याचबरोबरएकनाथ शिंदेआणिअजित पवारहे नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असणार आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संध्याकाळी दिल्लीत शिंदे, फडणवीस आणि पवार यांच्यासमवेत सत्तावाटपाचा तपशील आणि मंत्रिमंडळ रचना यावर चर्चा करण्यासाठी बैठक बोलावली असून त्यानंतर



घोषणा अपेक्षित आहे.

कोणत्या पक्षाचे किती मंत्री?

"शिवसेनेला सुमारे १२ मंत्रीपदे मिळण्याची शक्यता असून, यामध्ये काही महत्त्वाच्या खात्यांचाही समावेश आहे. दुसरीकडे राष्ट्रवादीलाही जवळपास १० मंत्रिपदे मिळणार आहेत. १३२ आमदार असलेल्या भाजपाच्या वाट्याला २१ मंत्रीपदे येण्याची शक्यता आहे. गृह, अर्थ, नागरी विकास आणि महसूल ही प्रमुख चार खाती भाजपा आपल्याकडे ठेवण्यास उत्सुक आहे. भाजपा गृह आणि अर्थ खात्यासाठी आग्रह धरू शकते," असे भाजपच्या अंतर्गत सूत्रांचे म्हणणे आहे.

महायुती सुसाट

राज्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले. त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झालेल्या निकालात महायुतीने बाजी मारत २३० जागांवर विजय मिळवला. यामध्ये भारतीय जनता पार्टीने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ५७ जागांवर बाजी मारली. महायुतीतून सर्वात कमी जागा लढवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही ४१ जागांवर विजय मिळवला.

महाविकास आघाडीचा धुव्वा

दुसरीकडे सर्वत्र महाविकास आघाडीची सत्ता येणार अशी चर्चा असताना त्यांचा सुपडा साफ झाला. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या वाट्याला अवघ्या ४७ जागा आल्या. यामध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने २०, काँग्रेसने १९, राष्ट्रवादीकाँग्रेसपक्ष शरदचंद्र पवार पक्षाने १०, समाजवादी पक्षाने २ व शेतकरी कामगार पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (एम) ने प्रत्येकी एका जागेवर विजय मिळवला.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार



# बागायती गव्हाची उशिरा पेरणी

**बागायती गहू पिकाची उशिरा पेरणीची शिफारस ही १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीसाठी आहे. मात्र काही भागांत १५ डिसेंबरनंतरही गहू पेरणी केली जाते. वास्तविक १५ नोव्हेंबरनंतर उशिरा पेरणी केल्यास पुढील प्रत्येक पंधरवड्यात हेक्टरी २.५ क्विंटल किंवा एकरी एक क्विंटलपर्यंत उत्पादनात घट येते.**

बागायती गव्हाची वेळेवर पेरणी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात करण्याची शिफारस आहे. मात्र विविध कारणांमुळे शेतकऱ्यांना शिफारशीत वेळेत पेरणी करणे शक्य होत नाही. या वर्षी जून महिन्यात मॉन्सूनच्या पावसाने उशिरा हजेरी लावल्यामुळे खरिपाच्या पेरण्या जुलै महिन्यात उशिराने झाल्या. परिणामी, खरीप हंगामात लागवड केलेल्या सोयाबीन, कापूस पिकांसह अन्य पिकांच्या काढणीस विलंब झाल्याने गहू लागवडीस उशीर होत आहे.

गहू पिकाचे एकूण उत्पादन हे पिकास मिळणाऱ्या थंडीच्या कालावधीवर बहुतांशी अवलंबून असते. गहू पिकाच्या वाढीसाठी ७ ते २१ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. तसेच दाणे भरण्याच्या वेळी २५ अंश सेल्सिअस इतके तापमान असल्यास दाण्यांची वाढ चांगली होऊन दाण्यांचे वजन वाढते. बागायती गहू पिकाची उशिरा पेरणीची शिफारस ही १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीसाठी आहे. मात्र काही भागांत १५ डिसेंबरनंतरही गहू पेरणी केली जाते. वास्तविक १५ नोव्हेंबरनंतर उशिरा पेरणी केल्यास पुढील प्रत्येक पंधरवड्यात हेक्टरी २.५ क्विंटल किंवा एकरी एक क्विंटलपर्यंत उत्पादनात घट येते.



## लागवड नियोजन

बागायती गव्हाच्या उशिरा पेरणीसाठी फुले समाधान (एनआयएडब्ल्यू-१९९४), निफाड ३४, एनआयएडब्ल्यू-३४ किंवा एकेएडब्ल्यू-४६२७ या सरबत्ती जातींची लागवड करावी. बागायती उशिरा पेरणीसाठी प्रति हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे वापरावे. बागायती गहू पिकाची उशिरा पेरणी १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत पूर्ण करावी. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाणांस ३ ग्रॅमची थायरम प्रक्रिया करावी. त्यानंतर २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम पीएसबी या जिवाणू संवर्धकाची प्रति किलो बियाणे प्रक्रिया करावी. पेरणी उथळ म्हणजे ५ ते ६ सें.मी. खोलीवर करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. पेरणी उभी-आडवी अशी दोन्ही बाजूंनी न करता ती एकेरी पद्धतीने करावी. आंतरमशागत सोईची होते. बियाणे मातीआड होऊन व्यवस्थित झाकले जाण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा. जमिनीचा उतार लक्षात घेऊन २.५ ते ४ मीटर रुंदीचे व ७ ते २५ मीटर लांब आकाराचे सारे पाडावेत. पेरणीनंतर तीन आठवड्यांनी पहिली खुरपणी करावी.

## पाणी व्यवस्थापन

जमिनीत कायमस्वरूपी ओलावा राहण्यासाठी पिकास नेहमीपेक्षा कमी अंतराने (१५ दिवसांनी) योग्य मात्रेत पाणी द्यावे. सिंचनासाठी तुषार सिंचनाचा वापर करावा. बागायत उशिरा पेरणी केलेल्या गहू पिकास जमिनीच्या मगदुरानुसार पाण्याच्या पाळ्या कमी जास्त होऊ शकतात. तुषार सिंचनाने शेवटचे पाणी ८० ते ८५ दिवसा दरम्यान द्यावे. जर एकच पाणी देणे शक्य असेल, तर पेरणीनंतर ४० ते ४२ दिवसांनी पिकास पाणी द्यावे. दोन पाणी देण्याइतके पाणी उपलब्ध असेल, तर पहिले पाणी पेरणीनंतर २० ते २२ दिवसांनी आणि दुसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी द्यावे. तीन पाण्याच्या पाळ्या देणे शक्य असेल, तर पहिले पाणी २० ते २२, दुसरे ४२ ते ४५ व तिसरे ६० ते ६५ दिवसांनी द्यावे.

## खत व्यवस्थापन

रासायनिक खतांच्या पहिल्या हप्त्यासह दोन चाड्यांच्या पाभरीने एकेरी पद्धतीने १८ सें. मी. अंतरावर पेरणी करावी. पेरणी करतेवेळी नत्राची अर्धी मात्रा तर संपूर्ण स्फुरद व



पालाश (९०:६०:४० नत्रःस्फुरदःपालाश किलो प्रति हेक्टरी) म्हणजेच ९८ किलो युरिया, ३७५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट व ६७ किलो म्युरेट ऑफ पोटॅशची प्रति हेक्टरी मात्रा द्यावी. उर्वरित नत्राचा हप्ता म्हणजेच ९८ किलो युरिया पहिली खुरपणी झाल्यानंतर तीन आठवड्यांनी पहिल्या पाण्याच्या वेळी द्यावी.



## सुधारित जाती

### सरबती जाती

- फुले समाधान, त्र्यंबक, तपोवन, एम.ए.सी.एस. ६२२२, एमएसीएस-६४७८.
- बागायती उशिरा पेरणीसाठी फुले समाधान, एकेएडब्ल्यू - ४६२७ जातीची शिफारस.
- पाण्याची उपलब्धता कमी प्रमाणात असल्यास एनआयएब्ल्यू - १४१५ (नेत्रावती) आणि एचडी २९८७ (पुसा बहर) जातींची निवड करावी.

### बन्सी जाती

- बागायती वेळेवर पेरणी एनआयडीडब्ल्यू - २९५ (गोदावरी) जातीची निवड करावी.
- उशिरा पेरणीसाठी एमएसीएस-४०२८, एमएसीएस-४०५८ जातींची निवड करावी.
- खपली गहू
- या गव्हाचा वापर रवा, खीर आणि नाश्त्याचे पदार्थ तयार करण्यासाठी केला जातो. तंतूंचे प्रमाण इतर गव्हाच्या तुलनेत जास्त असते (१६ टक्क्यांपेक्षा जास्त). या गव्हाच्या खाद्यपदार्थांमध्ये ग्लायकॅमिक निर्देशांक कमी असतो, मधुमेही रुग्णांच्या आहारात समाविष्ट. जात : एमएसीएस- २९७१.

## नवीन प्रसारित जाती

### फुले सात्त्विक (एन.आय.ए.डब्ल्यू.३१७०)

- संरक्षित पाण्याखाली पेरणीसाठी प्रसारित.
- प्रथिनांचे प्रमाण ११ ते १२ टक्के, बिस्कीट स्प्रेड मानक १० पेक्षा जास्त.
- दाण्याचा कडकपणा खूप कमी म्हणजे (३० ते ४५ टक्के) तसेच ब्रेड गुणवत्ता स्कोअर ७.० ते ७.५०, ग्लूटेन इंडेक्स ८० ते ८५ टक्के.
- चपातीचा गुणवत्ता स्कोअर हा ७ ते ७.५. यामध्ये लोहाचे प्रमाण हे ३५ ते ४० पीपीएम, झिंक ३० ते ३५ पीपीएम. तांबेरा रोगास प्रतिकारक्षम.
- उत्पादनक्षमता ३५ ते ४० क्विंटल प्रति हेक्टरी.

### फुले समाधान (एनआयएडब्ल्यू १९९४)

- बागायती क्षेत्रात वेळेवर (१ ते १५ नोव्हेंबर) तसेच उशिरा (१५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर) पेरणीसाठी योग्य.
- वेळेवर पेरणीसाठी उत्पादन ४६.१२ क्विंटल/हेक्टर.
- उशिरा पेरणीमध्ये उत्पादन ४४.२३ क्विंटल / हेक्टर.
- तांबेरा रोग तसेच मावा किडीस प्रतिकारक्षम.
- टपोरे व आकर्षक दाणे, प्रथिनांचे प्रमाण १२.५ ते १३.८ टक्के.
- चपातीची प्रत उत्कृष्ट व प्रचलित जातीपेक्षा सरस.
- प्रचलित जातीपेक्षा ९ ते १० दिवस लवकर येतो.

### एनआयडीडब्ल्यू -११४

- द्विपकल्पीय विभागातील जिरायती किंवा एका ओलिताखाली (एक पाणी पेरणीनंतर ४२ दिवसांनी) वेळेवर पेरणीसाठी शिफारशीत बन्सी जात.
- तांबेरा रोगास प्रतिकारक
- शेवया, कुरड्या व पास्ता यासाठी उत्तम
- तयार होण्याचा कालावधी ११० ते ११५ दिवस.
- उत्पादनक्षमता ३५ ते ४० क्विंटल प्रति हेक्टरी.

# गहू लागवडीचे तंत्र

**बागायती पेरणीची योग्य वेळ नोव्हेंबरचा पहिला पंधरवडा आहे. या कालावधीत पेरणी केल्यास उत्पादन चांगले येते. वेळेवर पेरणीसाठी हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. उशिरा पेरणीसाठी हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे वापरावे. संरक्षित पाण्याखालील लागवडीसाठी ७५ ते १०० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे.**

बागायती गव्हासाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी, भारी व खोल जमिनीची निवड करावी. तथापि, मध्यम जमिनीत भरखते व रासायनिक खतांचा वापर केल्यास उत्पादन चांगले घेता येईल. एक किंवा दोन पाणी उपलब्ध असल्यास लागवड जमिनीत ओलावा टिकवून धरणाऱ्या भारी जमिनीतच करावी. शक्यतो हलक्या जमिनीत गहू घेण्याचे टाळावे. पिकाच्या मुळ्या जमिनीत ६० ते ७५ सें. मी. खोलवर जातात. म्हणून या पिकासाठी चांगली भुसभुशीत जमिनीची निवड करावी. शेवटच्या कुळवणीच्या अगोदर १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत पसरावे.

संरक्षित पाण्याखालील पेरणी १ ते १० नोंव्हेंबरमध्ये करावी. बागायती वेळेवर पेरणीची योग्य वेळ नोव्हेंबरचा पहिला पंधरवडा आहे. या कालावधीत पेरणी केल्यास उत्पादन चांगले येते. बागायती गव्हाची पेरणीसुद्धा उशिरा करता येते. परंतु वेळेवर पेरणी केलेल्या गव्हापेक्षा उत्पादन कमी येते. बागायती गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबरनंतर उशिरा केल्यास प्रत्येक पंधरवड्यास हेक्टरी २.५ क्विंटल उत्पादन कमी येते. त्यामुळे १५ डिसेंबर नंतर पेरलेले गव्हाचे पीक फायदेशीर ठरत नाही. वेळेवर पेरणीसाठी हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. उशिरा पेरणीसाठी हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे वापरावे. संरक्षित पाण्याखालील लागवडीसाठी ७५ ते १०० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे.



पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम (७५ टक्के डब्ल्यूएस) ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करून बियाणे वाळवल्यानंतर प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. जिवाणू खतांच्या बीजप्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते. पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी. योग्य ओल नसल्यास प्रथम जमीन ओलवावी. वापसा आल्यावर जमीन कुळवावी. बागायत गव्हाची वेळेवर पेरणी दोन ओळीत २० सेंमी आणि उशिरा पेरणी १८ सेंमी अंतर ठेवून करावी. पेरणी ५ ते ६ सें. मी. खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. संरक्षित पाण्याखालील पेरणी दोन ओळींत २० सेंमी अंतर ठेवून करावी. पेरणी उभी-आडवी अशा दोन्ही बाजूंनी न करता ती एकेरी करावी म्हणजे आंतरमशागत करणे सोईचे होते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा म्हणजे बी व्यवस्थित दबून झाकले जाते. जमिनीचा उतार लक्षात घेऊन गव्हासाठी २.५ ते ४ मीटर रुंद आणि ७ ते २५ मीटर लांब आकाराचे सारे पाडावेत.

## खत व्यवस्थापन

बागायती पिकासाठी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत द्यावे. बागायती गव्हाच्या वेळेवर पेरणीसाठी हेक्टरी १२० किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे. निम्मे नत्र व संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्यावेळी व उरलेले निम्मे नत्र पेरणीनंतर ३ आठवड्यांनी खुरपणी झाल्यावर पहिल्या पाण्याच्या वेळी द्यावे. उशिरा केलेल्या पेरणीसाठी हे प्रमाण हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश इतके द्यावे. निम्मे नत्र व स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी व उरलेले निम्मे नत्र पेरणीनंतर ३ आठवड्यांनी द्यावे. पश्चिम महाराष्ट्रातील मैदानी खोल काळ्या जमिनीवर गव्हाच्या उत्पादनाकरिता पेरणीपूर्वी प्रति हेक्टरी १ टन शेणखत मिसळून पेरणी जोड ओळीत (१५ ते २० सेंमी) करून प्रति हेक्टर ७० किलो नत्र,३५ किलो स्फुरद किलो, युरिया-डीएपी ब्रिकेटमार्फत (२.७ ग्रॅ. वजनाची ब्रिकेट) १५ सेंमी अंतराच्या जोड ओळीत प्रत्येकी ३० सेंमी अंतरावर १० सेंमी खोल खोचावी. पश्चिम महाराष्ट्राच्या मैदानी प्रदेशातील लोहाची कमतरता असणाऱ्या जमिनीमध्ये अधिक उत्पादन, आर्थिक फायदा व जमिनीतील लोहाची पातळी राखण्यासाठी पिकास शिफारशीत अन्नद्रव्यांसोबत (१२०:६०:४०) नत्र : स्फुरद : पालाश किलो प्रति हेक्टर अधिक १० टन शेणखत प्रती हेक्टरी, मुरविलेले हिराकस २० किलो प्रति हेक्टरी (१०० किलो शेणखतात १५ दिवस मुरवून) जमिनीतून द्यावे. बागायती क्षेत्रात अधिक उत्पादन मिळविण्यासाठी पिकास शिफारशीत अन्नद्रव्यांची मात्रा देऊन पेरणीनंतर ५५ ते ७० दिवसांनी २०० ग्रॅम १९:१९:१९ या विद्राव्य खताची किंवा डीएपी या खताची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.



# हरभरा लागवड तंत्रज्ञान

**हरभरा हे महाराष्ट्रातील मुख्य कडधान्य पीक असून या पिकाला मध्यम ते भारी तसेच पाण्याचा चांगला निचरा होणारी सुपीक जमीन निवडावी. चोपण व आम्लयुक्त जमिनीत हे पीक घेण्याचे टाळावे. कोरडवाहू परिस्थीतीमध्ये जमिनीची कमीत कमी मशागत करावी जेणेकरून जमिनीतील ओल टिकवून राहण्यास मदत होईल. हरभरा लागवड तंत्राविषयी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने दिलेली माहिती पाहूया.**

- पेरणीचा कालावधी व पद्धत : जिरायती हरभऱ्याची पेरणी ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यात पूर्ण करावी. जिरायती परिस्थितीत देशी हरभरा झाडांची हेक्टरी संख्या राखण्याकरिता बियाणे चार तास पाण्यात भिजवून व नंतर सावलीत वाळवून बीजप्रक्रिया करूनच पेरावे. ओलिताखाली हरभरा ऑक्टोबरच्या दुसरा पंधरवड्यात पेरल्यास अधिक उत्पादन मिळते. काबुली हरभऱ्याची उशिरा पेरणी १० नोव्हेंबरच्या आसपास करावी. कोरडवाहू परिस्थीतीमध्ये दोन ओळीतील अंतर ३० सें.मी., तर दोन झाडातील अंतर १० सें.मी. ठेवावे. बागायती परिस्थीतीमध्ये व काबुली वाणाकरिता दोन ओळीतील अंतर ४५ सें.मी. व दोन झाडातील अंतर १० सें.मी. ठेवावे. ओलिताखालील हरभऱ्याच्या पेरणीसाठी रुंद वाफा पद्धत वापरणे फायद्याचे ठरते.
- बियाण्याचे प्रमाण : लहान आकाराच्या दाण्यांच्या वाणाकरिता हेक्टरी ५०-६० किलो बियाणे वापरावे. मध्यम आकाराच्या दाण्यांच्या वाणाकरिता हेक्टरी ७५-८० किलो बियाणे वापरावे. मोठ्या आकाराच्या दाण्यांच्या वाणाकरिता यामध्ये काबुली वाणांमध्ये विराट, बीडीएनजीके-७९८, पीकेव्ही काबुली-२ व पीकेव्ही काबुली-४ या वाणांचे १०० ते १२५ किलो प्रतिहेक्टर या प्रमाणात बियाणे पेरणीसाठी वापरावे.
- बीजप्रक्रिया आवश्यक : मर, मूळकुज किंवा मानकुज रोगांपासून बचाव करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति कीलो बियाण्याला ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा बुरशीनाशकाची किंवा २.५ ग्रॅम कार्बेन्डाझिम ची बिजप्रक्रिया करावी. द्रवरूप रायझोबियम १०० मिली + १०० मिली द्रवरूप पी.एस.बी. प्रति १० किलो बियाणे या प्रमाणात जिवाणू संवर्धनाची प्रक्रिया करावी.
- खत व्यवस्थापन : कोरडवाहू हरभऱ्यासाठी १०० किलो डी.ए.पी. वापरावे किंवा ४४ किलो युरिया + २५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट वापरावे. बागायती हरभऱ्यासाठी ५० किलो युरिया + ३०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट + ५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश वापरावे किंवा १२५ किलो डी.ए.पी. + ५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश वापरावे. गंधक किंवा जस्ताची कमतरता असणाऱ्या जमिनीत नत्र व स्फुरदासोबत २० किलो गंधक किंवा २५ किलो झिंक सल्फेट प्रतिहेक्टरी पेरणीपूर्वी जमिनीत पेरून द्यावे. फुलोरा अवस्थेनंतर नत्र स्थिर करण्याची प्रक्रिया मंदावते त्यामुळे पीक फुलोऱ्यात असताना २ टक्के युरियाची पहिली फवारणी व त्यानंतर १० दिवसांनी दुसरी फवारणी करावी.
- आंतरमशागत : पीक ४० ते ४५ दिवसांचे होइपर्यंत दोन कोळपण्या कराव्यात व एक निंदणी आवश्यकतेनुसार देऊन पीक तण विरहित ठेवावे.
- पाणी व्यवस्थापन : हरभरा पिकास पाणी शक्यतो तुषार सिंचनाने द्यावे. उगवणीनंतर पहिले पाणी पीक कळीवर असताना म्हणजेच पीक ४० ते ४५ दिवसांचे झाल्यानंतर, दुसरे पाणी घाटे भरतेवेळी म्हणजेच पीक ४० ते ४५ दिवसांचे झाल्यानंतर द्यावे. मर्यादित पाणी उपलब्ध असल्यास कमीत कमी एक पाणी घाटे भरतेवेळी द्यावे. दोन ओळी रुंद वरंबा सरी पद्धतीने ओलीत केल्यास इतर पद्धतीच्या मानाने ३० टक्के पाण्याची बचत होते. तसेच उत्पादनात २० टक्के वाढ मिळते. मध्यम जमिनीत २० ते २५ दिवसांनी पहिले, कळी असताना दुसरे व घाटे भरतेवळी तिसरे पाणी द्यावे. अधिक प्रमाणात पाणी दिल्यास पीक उधळण्याचा धोका असतो. जमिनीचा प्रकार आणि खोलीनुसार पाण्याच्या दोन पाळ्यामध्ये अंतर ठेवावे. मात्र पाणी देण्यास उशीर करून जमिनीस भेगा पडू देऊ नयेत. तसेच पाणी साचू देऊ नये. अन्यथा मुळकुजव्या रोगाने पिकाचे नुकसान होते.
- काढणी : हरभरा पीक परिपक्व झाल्यानंतर पाने पिवळी पडतात, घाटे वाळू लागतात. त्यानंतर पिकाची कापणी करावी. अन्यथा पीक जास्त वाळल्यावर घाटेगळ होऊन नुकसान होते. त्यानंतर खळ्यावर एक दोन दिवस काढलेला हरभरा वाळवून मळणी करावी.

### सुधारित वाणाची निवड

- देशी हरभरा : हा हरभरा मुख्यत्वे डाळीकरिता व बेसनाकरिता वापरतात. दाण्याच्या आकार मध्यम असतो. देशी हरभऱ्याच्या आकाश, विजय, बीडीएनजी ९-३, जाकी ९२१८, फुले विक्रम, विशाल, दिग्विजय या वाणांची निवड करावी.
- काबुली हरभरा : हा हरभरा छोले भटुरे बनविण्यासाठी वापरतात. काबुली हरभऱ्याच्या बीडीएनजीके- ७९८, पीकेव्ही काबुली-२, पीकेव्ही काबुली-४, विराट या वाणांची निवड करावी.
- हिरवा हरभरा : या वाणाच्या दाण्याचा रंग वाळल्यानंतर सुद्धा हिरवा राहतो. लागवडीसाठी हिरवा चाफा या वाणाची निवड करावी.

## शॉर्ट न्यूज

### श्रीरामपूरने काँग्रेसचा गड राखला

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर राहुरी विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाने सलग ३० वर्षे गड राखला. पक्षाचे उमेदवार हेमंत ओगले यांनी १३ हजारांच्या मताधिक्याने महायुतीतील शिवसेना शिंदे गटाचे भाऊसाहेब कांबळे यांचा पराभव केला. विद्यमान आ. लहू कानडे हे राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाची उमेदवारी मिळूनही चौथ्या क्रमांकावर फेकले गेले. जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे हे खऱ्या अर्थाने विजयाचे शिल्पकार ठरले. महायुतीला अंतर्गत बेबनावाचा मोठा फटका बसला. अखेरपर्यंत महायुतीचा अधिकृत उमेदवार कोण? हे स्पष्ट होऊ शकले नाही.

### बिबट्याच्या झुंजीत आजोबा जखमी

**राहुरी :** शेतात पिकाला पाणी देण्यासाठी गेलेल्या ६९ वर्षीय खंडेराव शेटे या शेतकऱ्यावर भर दुपारी बिबट्याने हल्ला केला. मात्र खंडेराव शेटे यांनी तरुणांना लाजवेल असे धाडस करून बिबट्याचा प्रतिकार केला. दगड, काठी जे हातात येईल त्याने बिबट्यावर प्रहार केले. बिबट्या बरोबरची ही झुंज सुमारे एक तास सुरू होती. दोघेही जखमी झाले. घायाळ झालेले दोघेही एकमेकांना प्रतिकार करत होते. आरडाओरडा ऐकून शेजारचे शेतकरी आले. त्यांनी बिबट्याला पिटाळताच तो शेजारच्या उसात पसार झाला.

### सोयाबीन खरेदी नोंदणीसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदत

**कोपरगाव :** शासनाने सोयाबीनला ४.८९२ रुपये आधारभूत दर जाहीर केला असून तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी उत्पन्न, बाजार समितीच्या मुख्य मार्केट यार्डमध्ये सोयाबीन खरेदी सुरू झालेली आहे. या खरेदीसाठी शासनाने हमीभावात सोयाबीन खरेदी नोंदणीसाठी ३० नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ दिली. असल्याची माहिती सभापती साहेबराव रोहोम यांनी दिली. सध्या सोयाबीनचे भाव पडलेले असल्याने यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे

### संगमनेर बसस्थानक खासगी वाहनांच्या विळख्यात

**संगमनेर :** हायटेक बसस्थानक म्हणून संगमनेरच्या बसस्थानकाची ओळख निर्माण झाली आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून हे बसस्थानक खासगी वाहनांच्या विळख्यात सापडले आहे. सर्रासपणे बसस्थानकाच्या आवारात या वाहने उभी केली जात आहेत. त्यामुळे अनेकदा एसटी बसला अडथळे निर्माण होत आहेत. मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्याने खासगी वाहनचालकांचे चांगलेच फावत आहे. त्यामुळे प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन उपाययोजना करण्याची गरज आहे.

### फिरोदिया शिवाजीयन्सचा संघ रवाना

**नगर :** वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनद्वारे आयोजित महाराष्ट्र स्टेट युथ लीग २०२४ साठी नगर शहरातील फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीचा १५ वर्षा खालील संघ लोणावळ्याला रवाना झाला. या स्पर्धेमधून महाराष्ट्रातील दोन सर्वोत्तम संघ राष्ट्रीय स्तरावरील ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशन युथ लीग साठी पात्र होणार आहेत. प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील पहिला संघ म्हणून सहभागी होण्याचा ऐतिहासिक मान फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी संघास मिळाला आहे.

# चला आळंदीला जावू । ज्ञानेश्वर डोळा पाहू ।।



प्रत्येक महिन्याला एकादशी तिथी येते, जी वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते. एकादशी निमित्त विठ्ठल मंदिरात यात्रा भरते. जाणून घेऊया उत्पन्न एकादशी निमित्ताने भरणाऱ्या आळंदी यात्रेचे महत्व.

एकादशी असली की आठवतात ते वारकरी आणि त्यांची पायी होणारी वारी. विठ्ठलाच्या चरणी माथा टेकायला वारकरी पायी पोहोचतात. आषाढी, कार्तिकी एकादशीला मोठा उत्सव बघायला मिळतो आणि या निमित्त यात्रा भरते. जशी पंढरपूर यात्रा प्रसिद्ध आहे तशीच आळंदी यात्रा देखील. या निमित्त होणारा उत्सवही मोठ्या भक्तिभावाने पार पडतो. पाहूया या यात्रेसंबंधी सविस्तर माहिती.

आळंदी महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र. हे पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यात इंद्रायणीकाठी वसलेले आहे. देवाची आळंदी म्हटले जाणाऱ्या या आळंदीला उत्पत्ती एकादशी आणि ज्ञानेश्वर महाराज समाधी उत्सवानिमित्त मंगळवार २५ नोव्हेंबर पासून यात्रा भरणार आहे.संत ज्ञानेश्वर महाराजांनी कार्तिक एकादशीला संजीवन समाधी घेतली होती. त्यानंतर विठुरायानं माझी कार्तिकीची एकादशी साजरी केली जाते तसेच तुझी देखील कार्तिक कृष्ण एकादशी साजरी केली जाईल असा आशीर्वाद श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वरांना दिला.

शिवपीठाचे ठिकाण व पुराणात वर्णिलेले सिद्धक्षेत्र म्हणून आळंदीची ख्याती असल्याचे सांगितले जाते. इंद्रायणीच्या पात्रात सिद्धबेट नावाचे स्थान आजही दाखविले जाते. ज्ञानेश्वरांनी येथे समाधी घेतल्यामुळे आळंदीचे महत्त्व आणखी वाढले. कार्तिकी व आषाढी एकादशीस, तुकारामबीजेस आणि अधिक मासात येथे मोठ्या यात्रा भरतात.

इंद्रायणी नदी व ज्ञानेश्वरांची समाधी यांशिवाय येथील गणपती, मुक्ताबाई, सिद्धेश्वर इत्यादींची मंदिरे, अजानवृक्ष व सोन्याचा पिंपळ, अनेक सिद्धपुरुषांची समाधीस्थाने व चांगदेव भेटीला आला असता ज्ञानेश्वरांनी चालविलेली भिंत इ. स्थळांना भाविक लोक भेट देऊ शकतात.ज्ञानेश्वर महाराजांचा समाधी सोहळा हा श्री गुरु हैबत बाबा यांच्या समाधी सोहळ्यापासून सुरू होतो. कार्तिकी अष्टमीला संजीव समाधी सोहळ्याला सुरुवात होते. कार्तिक अमावस्येपर्यंत हा सोहळा असतो. या सोहळ्याच्या दरम्यान येणाऱ्या कार्तिकी एकादशीला मोठे महत्त्व असते. या सोबतच कार्तिक अमावस्येला महाराजांच्या पालखीची नगर प्रदक्षिणा होते. आळंदी यात्रेला देखील टाळ, मृदुंगासह भाविकांचा मोठ्या उत्साहात सहभाग पाहायला मिळतो.

# एकाच दगडात दोन पक्षी, विखे यांनी काढला लोकसभेचा वचपा

## थोरातांची यंत्रणा शिर्डीत व्यस्त ठेवण्याची खेळी यशस्वी



**शिर्डी : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत जायंट किलर ठरलेल्या खासदार नीलेश लंके यांना संगमनेरकडून मोठी ताकद मिळाली होती. या पराभवाचा वचपा काढण्यासाठी, विखे पिता-पुत्रांनी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या बालेकिल्ल्याला सुरूंग लावून थोरातांना पराभूत केले. तर दुसरीकडे राणी लंकेंना पराभूत करत खा. नीलेश लंके यांनाही धक्का दिला. जिल्हाभरातच महाविकास आघाडीचा सुपडा साफ करून, विखेंनी एका दगडात दोन पक्षी मारून, पराभवाचा वचपा काढला आहे.**

थोरात व विखे या दोन्ही घराण्यात, धगधगत असलेला टोकाचा राजकीय संघर्ष जिल्ह्याने पाहिला आहे. लोकसभा निवडणुकीत डॉ. सुजय विखेंचा पराभव करण्यासाठी, संगमनेरमधून सूत्रे फिरवण्यात आली. त्यामुळे विखे विरूद्ध थोरात या संघर्षाला अधिक धार आली. विधानसभा निवडणुकीत डॉ. विखेंनी थेट संगमनेरमध्ये जाऊन थोरातांना आव्हान दिले. तर विखेंचा डाव उलटवून टाकण्यासाठी थोरातांनी शिर्डीत लक्ष घालून प्रभावती घोगरेंना बळ दिले. तेथे प्रियंका गांधींसह स्टार प्रचारकांच्या सभा घडवून आणल्या. परंतु, थोरातांना शिर्डीत गुंतवून संगमनेरात शिवसेनेच्या अमोल खताळांना ताकद देण्याची यशस्वी खेळी विखेंनी केली.

तसेच विखेंच्या व्यासपीठावरून देशमुखांची जीभ घसरल्यानंतर झालेल्या जाळपोळीची घटनाही विखेंच्या जिव्हारी लागली होती. पारनेरमध्ये अटीतटीच्या लढतीत विखेंनी शेवटच्या टप्प्यात सूत्रे फिरवून राणी लंकेंना पराभूत केले. खा. लंके यांनी विधानसभेला १२ चे १२ विधानसभेत आणून घालतो, असा शब्द शरद पवारांना दिला होता. पण, विखेंनी त्यांचे मनसुबे उधळून लावत, महाविकास आघाडीचा सुपडा साफ केला. तर कर्जतमध्ये रोहित पवारांना प्रत्येक मतासाठी झुंजावे लागल्याचे पहायला मिळाले.

**लोकसभेत कसे चुकले गणित**

लोकसभा निवडणुकीत डॉ. सुजय विखेंना शेवगाव (मताधिक्य ७८४१), राहुरी (११९३६), नगर शहर (३३५८६) मतदारसंघातून आघाडी मिळाली होती. तर पारनेर (३८१००), श्रीगोंदे (३२७११), कर्जत (९१२८ मताधिक्य) मिळवत लंकेंना आघाडी होती. या लोकसभेच्या गणितात, नवी सूत्रे जुळवून विधानसभेत डाव टाकला. जिल्हाभरात डॉ. विखेंनी १० जागांवर मविआला धक्का दिला.

**विखेंनी कुठे, कुठे लावली ताकद**

राहुरी विधानसभेत तनपुरेंबरोबरच विखेंचीही ताकद आहे, ही ताकद मताधिक्यातून विखेंनी दाखवून दिली. परंतु, तनपुरेंना येथे पराभवाचा सामना करावा लागला. पारनेरात काशिनाथ दातेंना बळ दिले. अपक्षाच्या माध्यमातून मतविभाजनाचा अचूक डाव साधत, लंकेंना धक्का दिला. तसेच संगमनेरात झालेला संघर्ष संपूर्ण जिल्ह्याने पाहिला.

**थोरातांच्या पराभवाची प्रमुख कारणे**

निष्ठावानांना दूर ठेऊन, बिल्डर लॉबीला जवळ केल्याचा समर्थकातून दबक्या आवाजात सूर थोरातांच्या बालेकिल्ल्यात अडीच वर्षांत विखेंनी रसद पुरवून महायुतीच्या कार्यकर्त्यांना पाठबळ दिले. विकास कामांना निधी देऊन कार्यकर्त्यांची मोट बांधली. थोरातांसह त्यांची यंत्रणा शिर्डीत गुंतवून ठेवण्यात विखेंची खेळी यशस्वी ठरली.

वाचकांच्या लेखणीतून

# विरामचिन्हांची परिभाषा




अर्थात स्पष्ट लेखन हा स्पष्ट विचार असतो.
संस्कृतीच्या एका विशिष्ट टप्प्यावर मानवाने लिपीचा शोध लावला. आदिमानवाच्या अग्नी, शेती इत्यादी शोधांप्रमाणेच लिपीचा शोधसुध्दा महत्त्वाचा आहे. लिपीच्या शोधामुळे मानव आपले भाव वाचणा-याच्या मनावर ठसवू लागला.
हिंदुस्थानवर इंग्रजांनी दीडशे वर्षे राज्य केले. ही गुलामीची अवस्था कोणत्याही राष्ट्राला भूषणावह नाही; परंतु इंग्रजांनी आपल्याला सार्वजनिक शिक्षण, अनुशासनप्रणाली, न्यायव्यवस्था, डाकव्यवस्था इत्यादी आधुनिक गोष्टीही दिलेल्या आहेत. हेही तितकेच खरे आहे. त्यामुळेच आपली इंग्रजी वाङ्मयाशी ओळखही झाली. आपला दृष्टिकोनसुध्दा विशाल झाला.
देवनागरी, मोडी, तमीळ, कन्नड इत्यादी लिप्या हिंदुस्थानात प्रचलित होत्या. त्यावेळी आपले लेखन बहुधा पद्यात्मक असे. जे काही गद्यलेखन असे तेही अगदी नगण्य असे. त्या लेखनात विरामचिन्हे नसत, हे विशेष!
इंग्रजी वाङ्मयामुळेच आपल्याला विरामचिन्हांच्या परिभाषेचे ज्ञान झाले. त्या विरामचिन्हांचा उपयोग आपण आपल्या लेखनात करू लागलो.
विरामचिन्हांची लक्षणे आणि उदाहरणे याप्रमाणे देता येतील :-
१) स्वल्प विराम ( , ) : दोन शब्दांत किंवा दोन वाक्यांत थोडा विश्राम () घ्यायचा असेल तर या चिन्हाचा उपयोग केला जातो.
उदा. अ) कमल, विमल आणि रमा भातुकलीचा खेळ खेळत आहेत.
ब) राम पळाला, शिवा पळाला आणि मग रतनही पळाला.
२) अर्ध विराम ( ; ) : दोन वाक्यांमध्ये थोडासा अधिक विश्राम असेल तेव्हा या विरामचिन्हाचा वापर होतो.
उदा. मयूर आला; पण मधू नाही आला.
3) पूर्ण विराम ( . ) : वाक्य पूर्ण झाल्यावर या विरमचिन्हाचा उपयोग करतात.
उदा. गणपत गावी गेला.
४) एकेरी अवरण चिन्ह ( ... ) : आपले स्वतःचे अथवा अन्य कुणाचे वक्तव्य किंवा उद्धरण दाखवायचे असेल तेव्हा हे विरामचिन्ह उपयोगात आणतात.
उदा. गुरुजी म्हणाले, पाचाचा पाढा म्हण.
५) दुहेरी अवतरण चिन्ह ( ''...'' ) : आपले स्वतःचे किंवा अन्य कुणाचे विशेष वक्तव्य सुचवायचे असल्यास या अवतरणचिन्हाचा उपयोग केला जातो
उदा. प्रा. पवार भाषणात म्हणाले, ''औरंगजेब धर्मवेडा होता.''
६) प्रश्नार्थक चिन्ह ( ? ) : प्रश्न विचारायचा असल्यास हे विरामचिन्ह वापरतात.
उदा. कमल कधी आलीस?
७) उद्गारवाचक चिन्ह ( ! ) : आश्चर्य, नाविन्य इत्यादी दाखवायचे असल्यास हे विरामचिन्ह उपयोगी पडते.
उदा. किती सुगंध दरवळला होता रातराणीच्या फुलांचा!
८) विसर्ग चिन्ह ( : ) : एखादा मुद्दा किंवा विचार विशेष रीतीने स्पष्ट करण्यासाठी येणा-या प्रातिनिधिक आणि ठळक शब्दाच्या अथवा वाक्याच्या अंती हे विरामचिन्ह येते.
उदा. हठयोग : बलात् केलेल्या योगक्रियेला हठयोग म्हणतात. वज्रासन, शवासन, वृक्षासन हे हठयोगाचेच प्रकार होत.
या विरामचिन्हांच्या प्रयोगांमुळे आपल्या लेखनात स्पष्टता उत्पन्न झाली. लिहिणा-याच्या मनातल्या भावना वाचणा-याच्या मनावर योग्य त-हेने उमटू लागल्या. आपल्या हिंदुस्तानी लिप्या आणि भाषा सशक्त आणि प्रभावशाली बनू लागल्या.

**नाना ढवळे, ८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# मराठ्यांच्या मतांमुळेच इतके आमदार निवडून आले : जरांगे

## नवे सरकार आले की लगेच उपोषणाची तारीख सांगणार

**वडीगोद्री : प्रतिनिधी**



**'आम्ही मराठे या वेळच्या मैदानातच नव्हतो तर आम्ही फेल झालो असे तुम्ही म्हणताच कसे ? काही बांडगुळं बोलताय, जरांगे फॅक्टर फेल झाला, पण आम्ही मैदानातच नाहीत. नवे सरकारही मराठ्यांच्या ताकदीवर येणार आहे. जेवढे लोक निवडून आलेत त्यांच्या मागे मराठा फॅक्टर आहे. काही जणांना दुसऱ्याचे पाळणे लोटायची सवय आहे,' अशा शब्दांत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी टीकाकारांना फटकारले.**

पत्रकार परिषदेत जरांगे म्हणाले, 'मी सरकारला सांगतो, तुम्ही मराठा आरक्षण तातडीने द्यावे, अन्यथा मराठे पुन्हा छाताडावर बसणार आहेत. आमच्यासोबत बेइमानी करायची नाही. सरकार स्थापन झाले की लगेच उपोषणाची तारीख ठरवून जाहीर करणार आहोत. आम्ही आमच्या लेकरांपासून दूर जाऊ शकत नाहीत. कोणाचेही सरकार येऊ द्या. त्यांचे सरकार आले आहे त्याबद्दल त्यांना शुभेच्छा. मोठ्या मनाने त्यांचे अभिनंदनसुद्धा केले पाहिजे आणि ते संस्कार मराठ्यांवर आहेत, पण मराठा आरक्षणात खोडा घालायचा नाही, नाही तर मराठे तुम्हाला ताळ्यावर आणल्याशिवाय राहणार नाहीत.'

जरांगे फॅक्टर कळायला तुमची हयात जाईल

'कोण निवडून आला काय आणि कोण पडला काय याचं आम्हाला काही सोयरसुतक नाही. एखाद्या आमदाराने म्हणावे की तो मराठ्यांच्या जिवावर निवडून आला नाही. जरांगे फॅक्टर आणि मराठा फॅक्टर कळायला तुमची हयात जाईल तरी तुम्हाला कळणार नाही. तुम्ही मराठ्यांच्या नादी कशाला लागता, असा सवालही मनोज जरांगे यांनी उपस्थित केला.

### 'महायुती' १६० पुढे गेल्याचे भाजपवाल्यांनाही आश्चर्य असावे

स्वीकारणे अवघड आहे. सातारा जिल्ह्यात 'महाविकास आघाडी'चे उमेदवार बाळासाहेब पाटील,पृथ्वीराज चव्हाण,सत्यजितसिंह पाटणकर यांना जवळपास सारखी मते पडली आहेत. पोस्टल मतांच्या तुलनेत मतयंत्राचा कौल फारच वेगळा आहे. आमच्या बालेकिल्ल्यात आमची वजावट झाल्याने कुठेतरी पाणी मुरतय हे जाणवायला लागले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'महायुती'ला लाडकी बहीण योजनेचा वाटतोय तेवढा फायदा झाला नसावा. त्यांच्या मताधिक्यामागे दुसरे काहीतरी कारण असावे, त्याचा अभ्यास करायला हवा. हाताला काम, पोटाला अन्न या व्यतिरिक्त हिंदुत्वाच्या मुद्द्यावर प्रचाराची दिशा वळवली गेली. संतांच्या भूमीत भाजपने मोठ्या प्रमाणावर केलेल्या भेदभावालाही काही प्रमाणात यश आले. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या भूमीत दोन्ही उमेदवार पडण्याचे कारण मतयंत्र तसेच हिंदुत्वाच्या मुद्द्यांनी केलेली वातावरण निर्मिती हेही असावे अशी शंका पवारांनी व्यक्त केली.

संविधान पायदळी तुडवतील

